# महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी
# प्रसारित कृषी यंत्रे आणि औजारे

## ट्रॅक्टरचलित ज्योती कांदा रोपे लागवड यंत्र-

**शिफारस-** कांदा रोपे लागवडीसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या ट्रॅक्टरचलित ज्योती कांदा रोपे लागवड यंत्राची  शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०११**

**वैशिष्ट्ये:**

- हे यंत्र ४५ ते ५५ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालविता येते.
- कांदा रोपाची लागवड २०x११ से.मी. करता येते.
- या यंत्राद्वारे एका तासात ०.०९१ हेक्टर क्षेत्रावर लागवड करता येते.
- या यंत्राद्वारे प्रचलीत पध्दतीपेक्षा २९१ मनुष्यबळ / हेक्टर (७२.७५%) बचत होते.

## स्वयंचलित लसूण घास कापणी यंत्र -

**शिफारस-** लसूण घास कापणीसाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या स्वयंचलित ज्योती लसूण घास कापणी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष - २०११**

**वैशिष्ट्ये:**

- हे यंत्र १.८ अश्वशक्तीच्या इंजिनने चालवता येते.
- या यंत्रामुळे प्रतीताशी ०.०८८ हेक्टर एवढ्या क्षेत्राची कापणी करता येते.
- या यंत्राची कार्यक्षमता ७७.०४ टक्के एवढी आहे.
- या यंत्राच्या वापरामुळे पारंपारिक पध्दतीपेक्षा प्रती हेक्टरी १३५ मनुष्यतासांची (९० टक्के) बचत होते आणि खर्चात (४७.९४ टक्के) बचत होते.

## ट्रॅक्टरचलित फुले सरीवरंबा बहुपीक टोकण यंत्र-

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित, ट्रॅक्टरचलित फुले सरीवरंबा बहुपीक टोकण यंत्राची सोयाबीन आणि हरभऱ्याची सरीवरंबा पध्दतीने लागवड करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०१२**

**वैशिष्ट्ये:**

- या यंत्राच्या सहाय्याने एकाच वेळी सरी वरंबा तयार करुन बियांची टोकण केली जाते.
- या यंत्राच्या सहाय्याने हरभरा, सोयाबीन इ. पिकांचे बी टोकण करता येते.
- सरी वरंब्याचा आकार आवश्यकतेनुसार बदलता येतो. तसेच दोन सऱ्यांमधील अंतर व दोन रोपांमधील अंतर बदलता येते.
- बियांची पेरणी वरंब्याच्या वरच्या टोकापासून सरीच्या तळापर्यंत आवश्यकतेनुसार कोणत्याही ठिकाणी करता येते.
- या यंत्राच्या सहाय्याने २.८ कि.मी. प्रतितास वेगाने ०.४६ हेक्टर क्षेत्रावर एका तासात सरी वरंबे तयार करुन बियांचे टोकण करता येते.

## १८ अश्वशक्तीच्य वरील ट्रॅक्टरचलित फुले ऊस आंतरमशागत यंत्र-

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित, १८ अश्वशक्तीच्या वरील ट्रॅक्टरचलित फुले ऊसआंतरमशागत यंत्राची १२० ते १५० सेंमी अंतरावरील ऊसाला भर देणे आणि दाणेदार खत पेरणीसाठीशिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०१२**

**वैशिष्ट्ये:**

- हे यंत्र १८.५ अश्वशक्ती पेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरच्या सहाय्याने ओढता येते.
- या यंत्राने मातीचा वरचा थर फोडणे, ऊसाला भर देणे आणि खत पेरणी अशी कामे एकाच वेळी करता येतात.
- खत पेरणी ऊसाच्या मुळांशी झाल्याने त्याची जोमदार वाढ होते.
- बाळ बांधणी तसेच मुख्य बांधणी सुध्दा पीकांचे नुकसान न करता करता येते.
- १२० से. मी. पेक्षा जास्त अंतरावरील ऊसामध्ये हे यंत्र वापरता येते.

## बहुउद्देशीय फुले शेती यंत्र-

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित बहुउद्देशीय "फुले शेती यंत्राची" कुळवणी, फणणी आणि विविध पिकांची पेरणी करण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०१२**

**वैशिष्ट्ये:**

- एका बैलजोडीच्या सहाय्याने चालणाऱ्या या यंत्राद्वारे फणणी, कुळवणी (तुर, सोयाबीन, उडीद, मका, भुईमुग, रबी ज्वारी इ.) विविध पिकांची पेरणी करता येते.
- आंतरपिकाची पेरणी देखील करता येते.
- दोन ओळीतील अंतर १२, १५ व १८ इंच इतके कमी अथवा जास्त करता येते.
- बियाणे नियंत्रित करणारी यंत्रणा बाजूला काढून ठेवता येते.
- खताची पेरणी मनुष्याद्वारे चाड्यामधून करता येते व बियाण्याच्या खाली व बाजूला २ ते २.५ सें.मी. वर खत पडते.
- बियाण्याच्या तबकड्या सहजरीत्या बदलता येतात.

## ट्रॅक्टरचलित फुले मोल नांगर-

**शिफारस-** कमी निचरा होणाऱ्या भारी काळ्या जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा निचरा करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या ट्रॅक्टरचलित फुले मोल नांगर वापरण्याची शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०१२**

**वैशिष्ट्ये:**

- मोल नांगरासाठी सुमारे २५,०००/- इतका खर्च येतो.
- मोल नांगरने मोल निचरा करण्यासाठी हेक्टरी रु. १५,०००/- इतका खर्च येतो.
- मोल नांगर ६० ते ७२ एच.पी. ट्रॅक्टरद्वारे ओढता येतो.
- मोल नांगराचा उपयोग भारी काळ्या जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा आणि क्षारांचा निचरा करण्यासाठी होतो.

## पॉवरटिलर चलित फुले बहुपीक टोकण यंत्र-

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित "पॉवरटिलर चलित फुले बहुपीक टोकण यंत्राची" विविध शेती पिकासाठी शिफारस करण्यात येते.



**प्रसारणाचे वर्ष २०१३**
**वैशिष्ट्ये:**

- वजनाला हलके, पॉवरटिलरने सहज ओढले जाते. वजनाचा समतोल साधल्यामुळे वळवतांना त्रास होत नाही.
- ज्वारी, सोयाबीन, हरभरा, मका, भुईमुग, सुर्यफूल, गहू इ. पिकांची टोकण करण्यासाठी उपयुक्त.
- बियाण्याची समान अंतरावर टोकण केल्यामुळे प्रति हेक्टरी रोपांची संख्या योग्य प्रमाणात राहते आणि उत्पादनात वाढ होते.

## कमी अश्वशक्ती (<२५) ट्रॅक्टरचलित फुले बहुपिक टोकण यंत्र-

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित, "कमी अश्वशक्ती (<२५) ट्रॅक्टरचलित फुले बहुपिक टोकण यंत्राची" विविध शेती पिकांसाठी शिफारस करण्यात येते.





**प्रसारणाचे वर्ष २०१३**
**वैशिष्ट्ये:**

- लहान ट्रॅक्टरच्या सहाय्याने ओढता येते.
- ज्वारी, सोयाबीन, हरभरा, मका, भुईमूग, सुर्यफूल, गहू इ. पिकांची टोकण करण्यासाठी उपयुक्त.
- टोकणबरोबरच दाणेदार खताची पेरणी करता येते.
- बियांची टोकण एक समान अंतरावर होते त्यामुळे प्रति हेक्टरी रोपांची संख्या योग्य प्रमाणात राहून उत्पादनात वाढ होते.

## बैलचलित फुले ऊस आंतरमशागत यंत्र-

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित, बैलचलित "फुले ऊस आंतरमशागत अवजारांची" ९० ते १०० सें.मी.अंतरावरील ऊसाला भर देणे आणि आंतरमशागतीसाठी शिफारस करण्यात येत आहे.







**प्रसारणाचे वर्ष २०१३**

**वैशिष्ट्ये:**

- ऊस पिकामध्ये गवत काढणे, आंतरमशागत आणि भर देण्यासाठी उपयुक्त.
- दोन ओळीतील अंतर ९० ते १०० सें.मी. असणाऱ्या ऊसासाठी उपयुक्त.
- लोखंडी असूनही वजनाला हलके असल्याने बैलजोडीने सहज ओढले जाते.
- बहुपयोगी अवजारांच्या विविध यंत्रणा सहजासहजी जलदगतीने बदलता येतात.

## मानवचलित 'फुले' बिया फोडणी यंत्र-

**शिफारस-** हिरडा आणि रिठा फोडण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित, मानवचलित 'फुले' बिया फोडणी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०१४**

**वैशिष्ट्ये:**

- हिरडा व रिठा या औषधी बिया फोडण्यासाठी उपयुक्त.
- हाताने बिया फोडण्यापेक्षा कमी कष्टात जास्त (११ ते १२ कि.ग्रॅ. प्रती तास) औषधी बिया फोडता येतात.
- वजनाला हलके (१२ कि.ग्रॅ.) असल्याने उचलून नेण्यासाठी सोपे.
- वापरासाठी सुलभ.

## मानवचलित 'फुले' ज्वारी काढणी यंत्र-

**शिफारस-** मुळासहित ज्वारी काढण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसति, मानवचलित 'फुले' ज्वारी काढणी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.






**प्रसारणाचे वर्ष २०१४**

**वैशिष्ट्ये:**

- बागायती तसेच कोरडवाहू ज्वारी मुळासहित काढण्यासाठी उपयुक्त.
- हाताने ज्वारी कुळासहित उपटुन काढण्यापेक्षा कमी कष्टात ज्वारी काढता येते.
- वजनाला हलके (२.१ कि.ग्रॅ.) असल्याने उचलून नेण्यासाठी सोपे.
- वापरासाठी सुलभ.

## फुले कडबा कुट्टी यंत्र-

**शिफारस-** एक अश्वशक्ती सिंगल फेजवर चालणाऱ्या विद्युत चलित फुले कडबा कुट्टी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०१५**

**वैशिष्ट्ये:**

- लहान व मध्यम शेतकऱ्यांसाठी उपयुक्त.
- सिंगल फेज एक अश्वशक्ती विद्युत मोटर चलित यंत्र.
- ओला चारा कुट्टी करण्याची कार्यक्षमता.
  ज्वारी : ८६.४ टक्के
  मका : ८४.१५ टक्के
  ऊस : ९१.९ टक्के
- कोरडा चारा कुट्टी करण्याची कार्यक्षमता.
  ज्वारी : ८६.३ टक्के
  मका : ८०.५ टक्के

## फुले पीव्हीसी भात लावणी चौकट-

**शिफारस-** भात पिकाच्या चार सूत्री लागवड तंत्रज्ञानांतर्गत, पुर्नलागवड (१५ सेंमी x २५ सेंमी अंतरावर) व ब्रिकेट खते वापरण्याची सुलभता (६५,५०० प्रति हेक्टर) आणि अधिक उत्पादनासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित १.२० मीटर x ०.४० मीटर आकाराच्या फुले पीव्हीसी भात लावणी चौकटीची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०१५**

**वैशिष्ट्ये:**

- चारसुत्री तंत्रज्ञानातील १५ सें.मी. अंतरख्ख्वर पुर्नलागवड करणे सोईचे होते.
- ब्रिक्वेट (गोळ्या) खतांचा वापर सुलभतेने करता येतो.
- नेहमीच्या पध्दतीपेक्षा ५-६ मजुर प्रती हेक्टरी बचत होते व उत्पादनात ३०-३५ टक्के वाढ होते.
- शेतकऱ्यांना वापरण्यास सोपी, हलकी व कमी खर्चाची आहे.

## ट्रॅक्टरचलित ऊस बांधणी यंत्र-

**शिफारस-** ऊस पिकात ४ किंवा ५ फुटाची सलग लागवड तसेच २.५ x ५ फुट जोड ओळ लागवड पध्दतीत ऊसाची मोठी बांधणी करण्याकरिता वसंतदादा शुगर इन्स्टिट्युटने विकसित केलेल्या ५० अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरचलित बांधणी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०१५**

**वैशिष्ट्ये:**

- ऊस पिकात १२० सेंमी, १५० सेंमी सलग लागवड व ७५ सेंमी, १५० सेंमी जोडओळ लागवडीत मोठी बांधणी करण्यासाठी उपयुक्त.
- एका दिवसात दोन हेक्टर क्षेत्रावरील ऊसाची मोठी बांधणी करता येते.
- मनुष्यबळाद्वारे केल्या जाणाऱ्या मोठ्या बांधणी खर्चाच्या तुलनेत ६६ टक्के बचत व बैल औजाराद्वारे केल्या जाणाऱ्या बांधणी खर्चाच्या तुलनेत ५४ टक्के बचत होते.

## ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे अवजार -

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे तयार करणाऱ्या अवजाराची शिफारस करण्यात येते.



**प्रसारणाचे वर्ष २०१६**

**वैशिष्ट्ये:**

- हायड्रॉलिक यंत्रणेच्या सहाय्याने २ मी. रुंदीचे बंदिस्त वाफे तयार करता येतात.
- वाफ्यांची लांबी आवश्यकतेनुसार बदलता येते.
- जलसंधारणासाठी अतिशय उपयुक्त यंत्र
- ३५ अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरद्वारे सहज चालविता येते.
- प्रक्षेत्रीय क्षमता ४.०० ते ४.५० हेक्टर प्रति दिवस.

## विद्युत मोटार चलित फुले बियाणे कवच फोडणी यंत्र-

**शिफारस-** हिरडा आणि रिठ्याचे कवच फोडण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या एक अश्वशक्ती सिंगल फेजवर चालणाऱ्या विद्युत मोटार चलित फुले बियाणे कवच फोडणी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०१६**

**वैशिष्ट्ये:**

- हिरडा व रिठा कवच फोडण्यासाठी उपयुक्त.
- एक अश्वशक्ती सिंगल फेज विद्युत मोटार चलित यंत्र.
- कार्यक्षमता- १२५ ते १५० किलो ग्रॅम/ तास.
- औषधी बिया फोडण्यासाठी लागणाऱ्या मजुरांची बचत करणारे यंत्र.

## फुले शेवगा काढणी झेला-

**शिफारस-** महात्मा फुले कृषि विद्यापीठाने विकसित केलेल्या मनुष्यचलित फुले शेवगा काढणी झेल्याची शिफारस करण्यात येते.



**प्रसारणाचे वर्ष २०१६**

**वैशिष्ट्ये:**

- उंच झाडावरील शेवग्याच्या शेंगा काढण्यासाठी उपयुक्त औजार.
- एका तासात २५० ते २८० शेंगा काढता येतात.
- शेंगाना इजा होत नाहीत.

## फुले ऊस बेणे कापणी यंत्र-

**शिफारस-** ऊस रोपवाटिकेसाठी एक डोळ्याचे ऊसाचे बेणे मोठ्या प्रमाणावर कापण्याकरिता शक्तीचलित (१ अश्वशक्ती, सिंगल फेज विद्युत मोटार) "फुले ऊस बेणे कापणी यंत्राची" शिफारस करण्यात येते.





**प्रसारणाचे वर्ष २०१७**

**वैशिष्ट्ये:**

- ऊस रोपवाटिका तसेच मोठ्या प्रमाणात ऊस लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उपयुक्त.
- शक्तिस्त्रोत- १ अश्वशक्ती सिंगल फेज विद्युत मोटार.
- एक डोळ्याचे ऊसाची बेणे कापण्याची क्षमता- ६६५० नग/ तास.
- एका वेळी चार मजुरांच्या सहाय्याने या यंत्राने बेणे कापणी करता येते.
- ऊस बेण्याची लांबी ४० ते ७० मि.मि. ठेवता येते.

## ट्रॅक्टरचलित फुले ऊस रोपे लागवड यंत्र-

**शिफारस-** ऊस रोपांची लागवड करण्यासाठी ट्रॅक्टरचलित "फुले ऊस रोपे लागवड यंत्राची" शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०१७**

**वैशिष्ट्ये:**

- एक तासात ०.२० हेक्टर क्षेत्रावर लागवड करता येते.
- प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ८५ टक्के.
- एकुण लागवडीच्या खर्चात पारंपारिक पध्दतीपेक्षा ६२ टक्के बचत होते.

## फुले कैरी तोडणी यंत्र-

**शिफारस-** लोणचे बनविण्याच्या लघु उद्योगासाठी कार्यक्षमतेने व किफायतशीरपणे कैऱ्या तोडण्याकरिता हाताने व पायाने वापरता येणारे फुले कैरी तोडणी यंत्राची शिफारस करण्यात येत आहे.

**प्रसारणाचे वर्ष २०१८**



## ट्रॅक्टरचलित-फुले हायड्रो-मेकॅनिक नियंत्रित तण काढणी यंत्र-



**प्रसारणाचे वर्ष २०१९**
**वैशिष्ट्ये:**

- दोन झाडांच्या ओळीतील तसेच दोन झाडांच्या मधल्या जागेतील तण काढण्यासाठी.
- तण काढणीचा खर्च रु. २२००/- ते २५००/- प्रति हे.
- पारंपारिक पध्दतीपेक्षा प्रति हेक्टरी १५०० ते १८०० रु. खर्चात बचत.

## ट्रॅक्टरचलित फुले कुट्टी यंत्र-

**शिफारस-** फळबागेतील छाटणीनंतर पडणाऱ्या अवशेषांची (१२ मि.मी. पर्यंत जाडीच्या) कुट्टी करुन बेडवर दोन्ही बाजूस समांतर टाकण्याकरिता ट्रॅक्टरचलित फुले कुट्टी यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येते.



**प्रसारणाचे वर्ष २०२०**
**वैशिष्ट्ये:**

- फळबागेतील छाटणीनंतर पडणाऱ्या अवशेषांची कुट्टी बेडवर दोन्ही बाजूस समांतर टाकण्याकरीता उपयुक्त.
- ३५ अश्वशक्ती पेक्षा मोठ्या ट्रॅक्टरवर सहज चालते.
- अवशेषांची कुट्टी करण्याकरिता ट्रॅक्टरच्या पी.टी.ओ. शक्तीचा वापर करुन कुट्टी केलेल्या अवशेषांची बेडवर दोन्ही बाजूस समांतर टाकण्याकरिता हायड्रोलिक शक्तीचा वापर केला आहे.
- प्रक्षेत्रावरील अवशेषांची कुट्टी करुन टाकण्याची क्षमता ०.४७ हे./ तास.

## ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो-मेकॅनिक नियंत्रित ऑफसेट फळबाग व्यवस्थापन यंत्र-

**शिफारस-** फळबागेतील एकाचवेळी जारवा तोडणे व वरंबा फोडण्याकरिता ट्रॅक्टरचलित फुले हायड्रो-मेकॅनिक नियंत्रित ऑफसेट फळबाग व्यवस्थापन यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येते.




**प्रसारणाचे वर्ष २०२०**

**वैशिष्ट्ये:**

- ३५ अश्वशक्ती पेक्षा मोठ्या ट्रॅक्टरवर सहज चालते.
- फळबागेतील झाडांना कोणतीही इजा न होता एकाच वेळी फळबागेतील जारवा तसेच वरंबा फोडणे ही दोन्ही कामे सहज करता येतात.
- हायड्रो-मेकॅनिक नियंत्रित सेन्सर्स वापरले आहे.
- प्रक्षेत्र व्यवस्थापन क्षमता ०.१३ हे./ तास.

## ट्रॅक्टरचलित फुले बंदिस्त वाफे अवजार-

**शिफारस-** जिरायती पिकांसाठी मुलस्थानी जलसंधारण करण्याकरिता ६ x २ मी. आकाराचे वाफे तयार करण्यासाठी ट्रॅक्टर चलित फुले बंदिस्त वाफे तयार करणारे अवजार प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येते.



**प्रसारणाचे वर्ष २०२०**

**वैशिष्ट्ये:**

- मध्यम ते खोल जमिनीत मुलस्थानी जलसंधारण करण्याकरिता उपयोग.
- २.६ x २ मीटर आकाराचे वाफे आपोआप तयार होतात.
- ३.३५ हॉर्सपॉवर ट्रॅक्टरच्या सहाय्याने चालविता येते.
- क्षेत्र क्षमता ०.४५ हेक्टर/ तास इतकी आहे.
- पारंपारिक पध्दतीपेक्षा मजुर व वेळेची मोठी बचत होते तसेच खर्चामध्ये ८३% बचत.
- अंदाजे किंमत रु. ४० हजार.

## ट्रॅक्टरचलित फुले ॲटोमॅटिक पल्टी नांगर-

**शिफारस-** सुलभपणे नांगरणी करण्याकरिता महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित ट्रॅक्टरचलित "फुले ॲटोमॅटिक पल्टी नांगर" प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०२१**

**वैशिष्ट्ये:**

- हा नांगर ४५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरने चालवता येतो.
- ॲटोमॅटिक पल्टी यंत्रणा दिलेली असल्याने हा नांगर ट्रॅक्टरच्या पोजिशन कंन्ट्रोल लिव्हर ने ॲटोमॅटिक पल्टी करता येतो.
- पल्टी करण्याकरीता मेकॅनिकल लिव्हर तसेच हायड्रोलिक सिलेंडरची आवश्यकता नाही.
- कार्यक्षमता ८०.४६ टक्के इतकी आहे.
- हायड्रोलिक नांगरापेक्षा देखभाल व दुरुस्तीचा खर्च कमी येतो.
- मुळ किंमत हायड्रोलिक नांगराच्या किंमतीपेक्षा जवळपास २० टक्क्यांनी कमी आहे.
- हलक्या, मध्यम व भारी जमिनीकरीता उपयुक्त आहे.

## ट्रॅक्टरचलित फुले सेंद्रिय भरखते देण्याचे यंत्र-

**शिफारस-** फळबागेला खते देण्यासाठी ट्रॅक्टरचलित फुले सेंद्रिय भरखते देण्याचे यंत्र प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०२२**

**वैशिष्ट्ये:**

- यंत्राची प्रभावी कार्यक्षमता- ०.३३ हे./ तास.
- प्रक्षेत्र कार्यक्षमता- ८१ टक्के.
- पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चात ५३ टक्के बचत होते.
- दोन ओळीतील अंतर २१०० मिमी किंवा त्याहून अधिक असलेल्या बागांसाठी योग्य.
- २२ एचपी किंवा त्याहून अधिक क्षमतेच्या ट्रॅक्टरसाठी योग्य

## ट्रॅक्टरचलित फुले दोन ओळींमध्ये चालणारा फॉरवर्ड-रिव्हर्स रोटाव्हेटर-

**शिफारस-** ऊसाच्या दोन ओळीतील आंतरमशागत तसेच भर घालणेकरिता ट्रॅक्टरचलित फुले दोन ओळींमध्ये चालणारा फॉरवर्ड-रिव्हर्स रोटाव्हेटर प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०२२**

**वैशिष्ट्ये:**

- यंत्राची प्रभावी कार्यक्षमता- ०.८० हे./ तास.
- प्रक्षेत्र कार्यक्षमता- ८१ टक्के.
- पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चात ७१ टक्के बचत होते.
- ४५ एचपी किंवा त्याहून अधिक क्षमतेच्या ट्रॅक्टरसाठी योग्य.
- पिकाच्या दोन ओळीतील अंतरानुसार रुंदी समायोजित करता येते.

## ट्रॅक्टरचलित फुले केळीखुंट कुट्टी यंत्र-

**शिफारस-** केळीच्या बागेत खुंटाची जागेवरच कुट्टी करणारे ट्रॅक्टरचलित फुले केळीखुंट कुट्टी यंत्र प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०२२**

**वैशिष्ट्ये:**

- यंत्राची प्रभावी कार्यक्षमता- ०.२० हे./ तास.
- प्रक्षेत्रीय कार्यक्षमता- ८२ टक्के.
- केळीचे खुंट शेतामध्ये जागेवरच कुट्टी करण्यासाठी उपयुक्त.
- पारंपारिक पध्दतीपेक्षा या यंत्राच्या वापरामुळे हेक्टरी ८४ टक्के इतकी बचत होते.
- ४५ अश्वशक्ती किंवा त्यापेक्षा जास्त ट्रॅक्टरने चालविता येते.

## फुले रस काढणी यंत्र-

**शिफारस-** फळे व भाज्यांचा रस काढण्यासाठी फुले रस काढणी यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०२२**

**वैशिष्ट्ये:**

- अधिक उत्पादनासह स्वच्छ रस काढणीत कमीत कमी नुकसान.
- वापरण्यास सोपे व सुरक्षित यंत्र.
- डाळिंब: रस उत्पादन- ७८.२७ टक्के
  रस काढणी कार्यक्षमता- ९४.३० टक्के
  यंत्राची क्षमता- ७३.४७ किलो/ तास
  रस काढणीतील नुकसान- ०.५३ टक्के
  तळाशी गाळ साचण्याचे किमान प्रमाण- १.१४ टक्के

## फुले रस काढणी यंत्र-

**शिफारस-** फळे व भाज्यांमधून रस काढण्यासाठी फुले रस काढणी यंत्र छोट्या प्रक्रिया उद्योजकांसाठी प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०२३**

**वैशिष्ट्ये:**

- रस निर्मिती खर्च- रु. २.१४ प्रति किलो
- यंत्राची कार्यक्षमता- फळांसाठी- २९ कि/ तास, भाज्यांसाठी- १८ कि/ तास
- रस काढणी क्षमता- फळे (९०-९१%), भाज्या (७३-७६%)
- सिंगल फेज विजेवर चालते
- रसामध्ये किमान गाळ- १.३०-१.३५%

## फुले ऊस पाने काढणी व कुट्टी यंत्र-

**शिफारस-** ऊसाची पाने काढणे व कुट्टी करण्यासाठी ट्रॅक्टरचलित फुले ऊस पाने काढणी व कुट्टी यंत्र प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.





**प्रसारणाचे वर्ष २०२३**

**वैशिष्ट्ये:**

- यंत्राची प्रभावी कार्यक्षमता- ०.३१ हे./तास
- प्रक्षेत्रीय कार्यक्षमता- ८२ टक्के
- पारंपारिक पध्दतीपेक्षा रु. ९,२९० प्रति हेक्टर अधिक निव्वळ बचत (८३.७० %)
- उभ्या ऊसाची पाने काढणे तसेच कुट्टी करणे करीता उपयुक्त
- २४ अश्वशक्ती किंवा त्याहून अधिक क्षमतेच्या ट्रॅक्टरसाठी योग्य

## फुले भुईमुग शेंगा फोडणी व वर्गवारी यंत्र-

**शिफारस-** भुईमुग शेंगा फोडणे तसेच शेंगदाणे, फुटके शेंगदाणे, शेंगा आणि टरफले वेगवेगळे करण्यासाठी विद्युत मोटारचलित फुले भुईमुग शेंगा फोडणी व वर्गवारी यंत्र प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०२३**

**वैशिष्ट्ये:**

- यंत्राची शेंगा फोडणी क्षमता- ६४ कि./तास (९३.८५ %)
- शेंगादाणे स्वच्छ करण्याची क्षमता- ८२ %
- पारंपारिक पध्दतीपेक्षा रु. २.६५ प्रति किलो अधिक निव्वळ बचत (६३.९४ %)
- १ अश्वशक्ती सिंगल फेज विद्युत मोटारने चालविता येते
- लहान व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी उपयुक्त

## फुले भेंडी प्लकर-

**शिफारस-** भेंडी तोडणीसाठी हस्तचलित फुले भेंडी प्लकर प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.







**प्रसारणाचे वर्ष २०२४**

**वैशिष्ट्ये:**

- भेंडी तोडताना त्वचेला इजा होत नाही.
- भेंडी तोडल्यानंतर पकडून ठेवते.
- भेंडीला इजा होत नाही.
- कमी किमतीचे, वजनाला हलके आणि अर्गोनिमिक डिझाईन.

## फुले मका कणीस सोलणी व दाणे काढणी यंत्र-

**शिफारस-** मक्याची कणसे सोलूण दाणे वेगळे करण्यासाठी विद्युत मोटार चलित फुले मका कणीस सोलणी व दाणे काढणी यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.





**प्रसारणाचे वर्ष २०२४**

**वैशिष्ट्ये:**

- मक्याचे कणीस सोलून दाणे काढण्यासाठी उपयुक्त.
- सिंगल फेज ०२ एच पी विद्युत मोटारद्वारे चालविता येते.
- दाणे काढण्याची क्षमता २१८ किलो प्रती तास.
- लहान आणि मध्यम प्रक्रिया उद्योगासाठी उपयुक्त.
- मक्याचे कणीस सोलण्याची कार्यक्षमता १०० टक्के, मक्याचे दाणे काढण्याची कार्यक्षमता ९९ टक्के आणि साफसफाईची कार्यक्षमता ९८ टक्के आहे.
- सर्वसाधारण कार्यक्षमता ९७ टक्के आहे.
- पारंपारिक पध्दतींपेक्षा वेळेत (९८ टक्के) आणि खर्चामध्ये (९५ टक्के) बचत होते.

**फुले अंजीर प्लकर-**

**शिफारस-** अंजीर फळांची तोडणी करण्यासाठी मनुष्यचलित फुले अंजीर प्लकर प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.




**प्रसारणाचे वर्ष २०२४**

**वैशिष्ट्ये:**

- अंजीर फळांची तोडणी करण्यासाठी उपयुक्त.
- फळाला इजा होत नाही.
- फळाची सहजपणे तोडणी करुन फळ धरुन ठेवता येते.
- अंजीर फळाची तोडणी कार्यक्षमता २७ किलो प्रति तास.
- मनुष्याच्या त्वचेला इजा होत नाही.

## फुले पोर्टेबल हायड्रॉलीक जनावरे उचलण्याचे यंत्र-

**शिफारस-** आजारी पशुधन जमिनीपासून उचलून सुलभतेने उपचार करण्यासाठी फुले पोर्टेबल हायड्रॉलीक जनावरे उचलण्याचे यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.





**प्रसारणाचे वर्ष २०२४**

**वैशिष्ट्ये:**

- मशिनची उचलण्याची क्षमता १५०० कि.ग्रॅ. आहे.
- मशीन हाताळण्यासाठी कमी मनुष्यबळ लागते.
- वाहतुकीस सुलभ.
- गोठ्याच्या अरुंद प्रवेशद्वारासाठी समायोज्य फ्रेम संरचना.
- खुरे काढण्याच्या सुविधेसाठी उपयुक्त.
- आजारी जनावरांच्या वैद्यकीय उपचारांसाठी उपयुक्त.

## फुले गुळ घोटणी व ढेपा भरणी यंत्र-

**शिफारस-** गुळ बनवताना घोटणी करणे आणि गुळाच्या ढेपा बनविण्यासाठी विद्युत मोटार चलीत फुले गुळ घोटणी व ढेपा भरणी यंत्र प्रसारीत करण्याची शिफारस करण्यात येत आहे.





**यंत्राद्वारे उत्पादन**



**पारंपारिक पध्दत**

**प्रसारणाचे वर्ष २०२४**

**वैशिष्ट्ये:**

- मशीनची क्षमता ८० किलो प्रति तास.
- गूळ तयार करताना अन्न सुरक्षा आणि स्वच्छता राखण्यास मदत.
- गुळाचे स्फटिकीकरण करण्यासाठी उपयुक्त.
- कमी मजुर लागतात.

## फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित-

**शिफारस-** एकत्रित मशागत करण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित ट्रॅक्टर चलित फुले स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०२५**

**वैशिष्ट्ये:**

- ५५ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरसाठी योग्य.
- स्पेड नांगर तव्याच्या कुळवासहित एकत्रित मशागतीने पेरणी योग्य जमीन तयार करण्यासाठी उपयुक्त.
- मशागतीसाठी लागणाऱ्या खर्चात आणि वेळेत बचत.
- एका तासामध्ये ०.३३ हेक्टर क्षेत्रावर मशागत.
- पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ४४% बचत.

## फुले फळबाग तण कापणी यंत्र-

**शिफारस-** फळबागेतील तण कापण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित ट्रॅक्टर चलित फुले फळबाग तण कापणी यंत्र प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०२५**

**वैशिष्ट्ये:**

- २४ व त्यापेक्षा जास्त अश्वशक्तीच्या ट्रॅक्टरसाठी उपयुक्त.
- फळबागेमध्ये गवत / तण कापणी करिता उपयुक्त.
- फळबागेतील दोन ओळीतील अंतरानुसार रुंदी समायोजित करता येते.
- फळबागेतील गवत कापणीची उंची समायोजित करता येते.
- यंत्राची प्रक्षेत्रीय क्षमता ०.५८ हेक्टर प्रति तास.
- प्रक्षेत्रीय कार्यक्षमता ७८%.
- पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चामध्ये ७५% बचत.

## फुले भुईमूग शेंगा तोडणी यंत्र-

**शिफारस-** भुईमुगाच्या शेंगा तोडण्यासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ विकसित विद्युत मोटर चलित फुले भुईमूग शेंगा तोडणी यंत्र प्रसारित करण्याची शिफारस करण्यात येत आहे.



**प्रसारणाचे वर्ष २०२५**

**वैशिष्ट्ये:**

- १ अश्वशक्ती, सिंगल फेज विद्युत मोटार चलित.
- भुईमुगाच्या वेलीपासून शेंगा तोडणी करिता उपयुक्त.
- यंत्राची भुईमूग शेंगा तोडण्याची कार्यक्षमता १६५ किलो प्रति तास इतकी आहे.
- लहान आणि सीमांत शेतकऱ्यांसाठी उपयुक्त.
- यंत्राच्या वापरामुळे पारंपारिक पध्दतीपेक्षा खर्चात ८३% आणि वेळेत ९७% बचत.